# विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रमाचे उद्घाटन




**मोताळा, ५ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे दिनांक ५ ऑगस्ट ते १३ऑगस्ट २०२२ पर्यंत ७ दिवसीय इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाअंतर्गत पहिल्या दिवशी अध्यक्ष तसेच मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गजानन जाधव यांनी उपस्थिती होती.

प्रमुख उपस्थिती प्रा. सुनील मामलकर, कॅप्टन अविनाश मेहेरकर , प्राध्यापिका नंदा मास्कार, डॉ.प्रवीण ठेंग यांची लाभली. शाळा ते विद्यापीठ, महाविद्यालयीन जीवनातील ही सर्वात आव्हानात्मक घटनांपैकी एक आहे. नवीन विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयात प्रवेश करतात तेव्हा त्यांच्या मनात विविध विचार येतात. ते नविन वातावरणात प्रवेश करतात, त्यांना महाविद्यालयीन विद्यार्थी भूमिकेची ओळख करून देणे हा स्टुडंट् इंडक्शन चा भाग आहे तसेच महाविद्यालयीन शिक्षणासाठी व्यतिरिक्त इतर कोर्सेस सुध्दा विद्यार्थ्यांनी करावेत असे आवाहन प्राचार्यांनी केले. महाविद्यालयातील सर्व भौतिक सोयी सुविधा, ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, एन सी सी, एन, एस,एस, स्पोर्ट्स या बाबींची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमाचे आयोजन भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा.धीरज चंन्रेकर (कार्यक्रम समन्वयक) यांनी केले. सुत्रसंचलन प्रा.भास्कर भिसे, तसेच आभार प्रदर्शन प्रा. दादा मनगटे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयात प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.